शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक २४२ । रविवार, दि.२२ जून २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर




## पंढरपुरात मद्यविक्री बंद

**पुणे ।** ४ जुलैपासून ते ७ जुलैपर्यंत पंढरपूर शहर आणि ५ किलोमीटर परिसरातील सरकारमान्य मद्य आणि ताडी विक्री दुकाने बंद राहतील, असा आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. तसेच पालख्या सोलापूर जिल्ह्यातील येण्याच्या मार्गावरील मद्य आणि ताडी विक्री दुकाने त्या त्या दिवशी बंद राहतील, असा आदेश दिला आहे. यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही आणि कायदा सुव्यवस्थेला बाधा पोहोचणार नाही. त्यामुळे हा निर्णय घेतला असल्याचे प्रशासनाने सांगितले.

# इस्रायल-इराण संघर्षावर भारताचे मौन चिंताजनक-सोनिया गांधी

### हल्ल्यांमुळे संघर्षाची बीजे

सोनिया गांधी यांनी म्हटले आहे की, इस्रायलने १३ जून रोजी इराणवर हल्ला केला, त्याचे मध्य-पूर्वेत तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. इस्रायलने इराणच्या भूमीवर केलेले हल्ले व बॉम्बस्फोटांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने निषेध केला आहे. इस्रायलच्या गाझामधील क्रूर कारवायांमुळे तिथले नागरी जीवन उद्ध्वस्त झाले आहे. यामुळे अस्थिरता आणखी वाढेल आणि संघर्षाची बीजे पेरली जातील.

**नवी दिल्ली ।** माजी काँग्रेस अध्यक्षा व ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी इस्रायल-इराण युद्धाबाबत केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका केली आहे. त्यांनी पश्चिम आशियातील विद्यमान स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्या म्हणाल्या की, गाझा व इराणमधील विध्वंसावर नवी दिल्लीने शांत बसणे हे म्हणजे आपण आपल्या मूल्यांचा त्याग करणे आहे. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी 'भारताचा आवाज ऐकायला अजूनही उशीर झालेला नाही' या शीर्षकासह एक लेख लिहिला आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, इस्रायलसह स्वतंत्र पॅलेस्टाइनची कल्पना करणाऱ्या शांततापूर्ण द्विपक्षीय तोडग्याचे भारताने प्रदीर्घ काळापासून समर्थन केले आहे. मात्र, नवी दिल्लीने आपल्या तत्वनिष्ठ वचनबद्धतेचा त्याग केल्याचे दिसते आहे.



### अजूनही उशीर झालेला नाही

सोनिया गांधी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही टीका केली आहे. ट्रम्प यांनी विध्वंसक मार्ग निवडल्याचे गांधी यांनी म्हटले आहे. गाझामधील विध्वंस व इराणमध्ये विनाकारण होत असलेले हल्ले पाहूनही नवी दिल्लीने त्यावर मौन बाळगणे म्हणजे आपल्या नैतिक व राजनैतिक परंपरांचा त्याग करत आपली मूल्ये सोडली आहेत, असे दिसते आहे. मात्र, अजूनही उशीर झालेला नाही. भारताने यावर स्पष्ट बोलले पाहिजे, जबाबदारीने वागले पाहिजे आणि पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी, संवादाला सुरुवात करण्यासाठी उपलब्ध असलेल्या प्रत्येक राजनैतिक मार्गाचा वापर केला पाहिजे.

### सरकार नैतिक मूल्यांपासून विचलित

या मानवनिर्मित आपत्तीच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी सरकारने भूमिका घेताना भारताची दीर्घकालीन तत्वनिष्ठ वचनबद्धता जवळजवळ सोडून दिली आहे. भारताने नेहमीच परस्पर सुरक्षितता व सन्मानाने इस्रायलच्या शेजारी राहणाऱ्या सार्वभौम, स्वतंत्र पॅलेस्टाइनची कल्पना केली आहे. मात्र, आपले विद्यमान सरकार यापासून विचलित झाल्याचे दिसते आहे, असेही सोनिया गांधी यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात

### ऑपरेशन सिंधू नेपाळ अन् श्रीलंकेसाठीही

**नवी दिल्ली ।** इराण आणि इस्रायल यांच्यातील सध्याच्या संघर्षादरम्यान, भारताने आपल्या नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी आणण्यासाठी सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंधू' मोहिमेत आता नेपाळ आणि श्रीलंकेच्या नागरिकांनाही बाहेर काढले जाणार आहे. तेहरानमधील भारतीय दूतावासाने ही माहिती दिली आहे. भारतीय दुतावासाने म्हटले की, नेपाळ आणि श्रीलंका सरकारच्या विनंतीवरून, इराणमधील भारतीय दूतावासाच्या सुटकेच्या प्रक्रियेत नेपाळ आणि श्रीलंकेच्या नागरिकांचाही समावेश केला जाईल. शनिवारी, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, आतापर्यंत ५१७ भारतीय नागरिकांना इराणमधून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे.

### कोकणात अवजड वाहतूक बंद

**सातारा ।** कोकण पश्चिम महाराष्ट्र होणाऱ्या महत्त्वाच्या मार्गावरील अवजड वाहतूक बंद करण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्ग १६६ ई हा चिपळूण ते कराडदरम्यान अवजड वाहतुकीसाठी दि. २७ जूनपर्यंत बंद करून ही वाहतूक अन्य मार्गांनी वळविण्यात आलेली आहे. चिपळूणकडून कराडकडे येण्यासाठी अवजड वाहनांची वाहतूक आंबा घाटमार्गे वळवण्यात आल्याची अधिसूचना प्रशासनाकडून आज काही वेळापूर्वीच जारी करण्यात आली आहे.

### इंडिगो विमानाचे आपत्कालीन लँडिंग

**बंगळुरु ।** अहमदाबाद विमान अपघातानंतर आणखी एक अपघात टळला. इंडिगोच्या गुवाहाटी-चेन्नई विमानाचे बंगळुरूमध्ये आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. पायलटने मेडेवर कॉल दिला होता. या विमानात इंधन कमी होते. त्यानंतर या विमानाचे केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. इंडिगो विमानाच्या आपत्कालीन लँडिंगची ही घटना गुरुवारी घडली. या घटनेनंतर वैमानिकाला पदावरुन हटण्यात आले आहे. इंडिगो विमानात इंधनाची गंभीर कमतरता होती, त्यानंतर ते बेंगळुरूमध्ये सुरक्षितपणे उतरवण्यात आले. दरम्यान अहमदाबादच्या घटनेनंतर ही घटना घडणे म्हणजे आता प्रवाश्यांच्या मनात प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. अशातच बऱ्याचशा प्रवाश्यांनी आपली तिकीटे रद्द केल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले आहे.

# 'फिक्सिंग'वर स्पष्टीकरण

## निवडणूक आयोगाने राहुल गांधींना दिले प्रत्युत्तर

**नवी दिल्ली ।** केंद्रीय निवडणूक आयोगाला निवडणुकीदरम्यानचे सीसीटीव्ही फुटेजचा गैरवापर केला जाऊ शकतो, असा संशय आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने राज्य निवडणूक अधिकाऱ्यांना निवडणुकीनंतर ४५ दिवसांत निवडणुकीला न्यायालयात आव्हान देण्यात आले नाही तर निवडणूक प्रक्रियेचे सर्व सीसीटीव्ही फुटेज, वेबकास्टिंग आणि व्हिडीओ फुटेज नष्ट करण्यात यावेत, असे आदेश देण्यात आले होते. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या या आदेशावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी टीका केली होती. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर निशाणा साधत निवडणुकीवर मॅच फिक्सिंगचा आरोप केला होता. त्यावर केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रत्युत्तर दिले आहे.




### राहुल गांधी यांचे आरोप

वोटर लिस्ट? वाचनीय मशीन फॉर्मेट देणार नाही. सीसीटीव्ही फुटेज देणार नाही. कायदा बनवून लपवणार तसेच निवडणुकीचे फोटो-व्हिडीओ हे आता १ वर्ष नाही तर ४५ दिवसांत नष्ट करणार. निवडणूक आयोगाकडून उत्तरे पाहिजेत तर तेच पुरावे नष्ट करत आहेत. असे स्पष्ट दिसतेय की, मॅच फिक्सिंग आहे. आणि फिक्स केलेली निवडणूक ही लोकशाहीसाठी विष आहे, अशी टीका राहुल गांधी यांनी केली होती. दरम्यान निवडणूक आयोगाने उत्तर दिल्याने राहुल गांधी निरुत्तर झाले.

### आश्वासनांची खैरात

खा. राहुल गांधी यांनी मेक इन इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून कारखान्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, तेजी येईल असे आश्वासन दिले होते. मग उत्पादन विक्रमी नीचांकी पातळीवर का आहे? तरुणांची बेरोजगारी का वाढली आहे? मग चीनमधून होणारी आयात दुप्पट का झाली आहे?, असे सवाल राहुल गांधी यांनी केले आहे. नरेंद्र मोदी हे मेक इन इंडियावरील उपयांऐवजी घोषणा देण्यावर पुढे आहेत. २०१४ पासून उत्पादन आपल्या अर्थव्यवस्थेच्या १४ टक्क्यापर्यंत घसरले आहे. भारताला एका मूलभूत बदलाची आवश्यकता आहे, जी प्रामाणिक सुधारणा आणि आर्थिक पाठिंब्याद्वारे लाखो उत्पादकांना सक्षम बनवेल, असेही राहुल गांधींनी म्हटले आहे.

### निवडणूक आयोग काय म्हणाले?

निवडणुकीचे सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक झाले तर सर्वसामान्यांच्या गोपवीयतेचे उल्लंघन होईल. सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक केले तर कोणी मतदान केले आणि कोणी केले नाही, ते समजेल. यामुळे नागरिकांवर दबाव आणला जाऊ शकतो. त्यांच्याशी भेदभाव केला जाऊ शकतो. असामाजिक घटक त्यांना धमकावू शकतात, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. सीसीटीव्ही फुटेज शेअर केल्यास कोणताही गट किंवा व्यक्ती मतदारांना सहजपणे ओळखू शकते. यामुळे मतदान करणारे आणि न करणारे या दोघांवरही असामाजिक घटकांकडून दबाव, भेदभाव आणि धमकीचा धोका वाढेल, असे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे असे केल्याने लोकप्रतिनिधी कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन होईल. तिसरे म्हणजे हे व्हिडीओ केवळ अंतर्गत देखरेखीसाठी आहेत. ते न्यायालयाच्या आदेशानुसारच दिले जाऊ शकतात, असे स्पष्टीकरण निवडणूक आयोगाने दिले आहे.

# निर्णयाकडे राजकीय नजरेतून पाहणे चुकीचे-घोसाळकर

**मुंबई ।** भाजप नेते आणि मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेवक तेजस्वी घोसाळकर यांची बँकेच्या संचालक मंडळावर नियुक्ती केली आहे. या नियुक्तीने तेजस्वी घोसाळकर यांच्या भाजप प्रवेशाची आणखी चर्चा रंगली आहे. तेजस्वी घोसाळकर यांचे दिवंगत पती, माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती, त्यांच्या रिक्त जागेवर नियुक्ती करण्यात आली असल्याचे प्रवीण दरेकर यांनी म्हटले आहे. त्यांच्या दुःखद मृत्यूनंतर, मंडळाला बदली नियुक्त करण्याचा अधिकार होता. सद्भावना म्हणून, तेजस्वी घोसाळकर यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे कायदेशीर आणि बँकेच्या नियमांनुसार असल्याचेही दरेकर म्हणाले.



दरम्यान, तेजस्वी घोसाळकर यांनी संचालक होताच अप्रत्यक्ष पक्षाला आरसा दाखवत पोस्ट केली आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, माझे पती अभिषेक घोसाळकर यांच्या रिक्त असलेल्या मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदावर माझी एकमताने निवड केल्याबद्दल मी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर तसेच सर्व संचालक मंडळाचे मनापासून आभार मानते. सहकारात राजकीय पक्षाचे जोडे बाहेर ठेवून काम करणे हाच खरा सहकार धर्म आहे, त्यामुळे या निर्णयाकडे राजकीय नजरेतून पाहणे अत्यंत चुकीचे ठरेल. हा माझा सहकार क्षेत्रातील एक महत्त्वाचा व पहिलाच अध्याय आहे, मी पुन्हा एकदा सर्व नेतृत्वाचे आभार मानते, असे त्यांनी सांगितले. तेजस्वी घोसाळकर यांनी दहिसर विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेच्या महिला शाखेच्या प्रमुखपदाचा राजीनामा दिल्यानंतर एका महिन्यापेक्षा जास्त काळानंतर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले असून शिवसेना (उबाठा)चा मोठा मासा भाजपाच्या गळाला लागण्याची शक्यता आहे.

# २१ तारखेला केला मॅरेथॉन योगा

## शिंदेंचा शिवसेनेतील बंडावरुन ठाकरेंना खोचक टोला

**मुंबई ।** आज २१ जून रोजी देशात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जात आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सवाल करण्यात आला असता त्यांनी मिश्किल वक्तव्य केले. याआधी तीन वर्षांपूर्वी मुंबई ते गुवाहाटी येथे २१ तारखेला आम्ही मॅरेथॉन योगा केला होता, असे म्हणत शिवसेनेतील बंडावरून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी योग दिनानिमित्त मिश्कील टिप्पणी केल्याचे पाहायला मिळाले. शिवसेनेतील बंडावरून एकनाथ शिंदे यांनी भाष्य करत उद्धव ठाकरेंना खोचक टोला लगावला आहे. एकनाथ शिंदे म्हणाले की, २१ तारखेला आम्ही एक मोठा योग केला, तो एक मॅरेथॉन योग होता. तो योग मुंबईपासून सुरू झाला आणि त्यामुळे २१ जून रोजी महाराष्ट्रात खूप बदल झाला आहे आणि आता राज्यात आपण विकास पाहत आहात. यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेपासून त्यांचा गट वेगळा झाला त्या दिवसाच्या बंडाची आठवण करून देत टोला लगावला. शिंदे म्हणाले, २१ तारखेमुळे आज महाराष्ट्रात बदल झाला आहे. मुंबईचा विकास होत आहे. हे जनतेचे आणि सामान्य लोकांचे सरकार आहे. आमच्या सरकारने खूप काम केले आहे. यावेळीही आम्ही राज्याला पुढे घेऊन जाऊ. पंतप्रधान मोदी आमच्यासोबत आहेत आणि हे डबल इंजिन सरकार आहे.



# विमान अपघातानंतर तीन कर्मचाऱ्यांवर कारवाई

**अहमदाबाद ।** येथे झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर आता मोठी कारवाई करण्यात आली आहे. इतकेच नाही तर डीजीसीएने एअरलाईनला कारणे दाखवा नोटीस देखील बजावली आहे. एअर इंडियाला ठरवून दिलेल्या फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन (एफडीटीएल) नुसार वैमानिकांना १० तासांपेक्षा जास्त वेळ उड्डाण करण्यास भाग पाडले आणि १६ आणि १७ मे रोजी बंगळुरू-लंडन या दोन उड्डाणे केली याबद्दल ही नोटीस बजावण्यात आली आहे. आदेशात म्हटले आहे की, एअर इंडियाला या तीन अधिकाऱ्यांच्या विरोधात तत्काळअंतर्गत शिस्तभंगाची कारवाई सुरू करावी लागेल. जोपर्यंत शेड्यूलिंग संबंधी प्रक्रियेत आवश्यक सुधारणा पूर्ण होत नाहीत तोपर्यंत हे अधिकारी फ्लाइट सुरक्षा किंवा क्रू संबंधी जबाबदारी असलेल्या पदावर राहाणार नाहीत.





११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनासाठी संपूर्ण जगात प्रचंड उत्साह दिसून आला असून यापासून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीही वाचले नाही. त्यांनी आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे योग दिनाच्या कार्यक्रमात भाग घेतला. सर्व स्तरातील लोकही त्यात सहभागी झाले होते. यावेळी विविध योगांची आसने मोदी यांनी यावेळी केली. तर गुजरात येथील अहमदाबाद येथील केंद्राचे गृहमंत्री यांनीदेखील योग साधना करत सुदृढ आरोग्य ठेवण्याचा संदेश दिला.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2150 |
| नवती (२) | : 1950 |

## मिश्किली




# शाळेत हिंदीऐवजी वाटली पंजाबी पुस्तके

**मुंबई ।** महाराष्ट्रात हिंदी सक्तीवरुन वाद सुरु असतानाच मुंबईतील एका नामांकित शाळेत पंजाबी भाषेची पुस्तके वाटण्यात आली आहेत. यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात हिंदी भाषेच्या सक्तीवरुन मोठ वाद सुरु आहे. आता या वादात विचित्र ट्विस्ट आला आहे. मुंबईतील एका नामांकित शाळेत पंजाबी भाषेची पुस्तके वाटण्यात आली आहेत. यामुळे राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुन्हा एकदा आक्रमक झाली आहे. पुस्तके परत घेण्याची मागणी मनसेने केली आहे. महाराष्ट्रात हिंदी सक्ती चालणार नाही आणि पंजाबी सक्ती तर मुळीच खपवून घेतली जाणार अशी ठाम भूमिका मनसे आहे. मुंबईच्या भांडुप परिसरात असलेल्या गुरुनानक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना पंजाबी भाषेची पुस्तके वाटण्यात आली. मनसेच्या कार्यकर्त्यांनी दिली शाळेला धडक. अखेर शाळा प्रशासनाकडून वाटण्यात आलेली पंजाबी पुस्तके परत घेण्यात येणार याचे आश्वासन देण्यात आले.

# शशी थरुर भाजपात जाणार का? उद्या निर्णय

## १६ वर्षापासून काँग्रेसशी एकनिष्ठ असलेला नेता सोडणार पक्षाची साथ?

**नवी दिल्ली ।** पहलगाम हल्ल्यानंतर भारताची शिष्टमंडळे जगभरात पाकिस्तानचा दहशतवादाचा बुरखा फाडण्यासाठी रवाना झाली होती. या पाच शिष्टमंडळांपैकी तीन सत्ताधारी आणि दोन विरोधक या शिष्टमंडळांचे नेतृत्व करत होते. यामध्येच एक काँग्रेसचे खासदार शशी थरूर होते. त्यांनी काँग्रेसना न पटणारी विधाने केली होती. आता त्यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आपल्याला फक्त त्या हल्ल्यांबद्दल माहिती मिळते जे आपण उधळून लावण्यात अयशस्वी झालो. कोणत्याही देशात ही एक सामान्य गोष्ट आहे. कोणत्याही देशाकडे विश्वासार्ह गुप्तचर यंत्रणा नाही, असे त्यांनी म्हटले होते. यावरून काँग्रेस नाराज झाली होती. अनेक नेत्यांनी थरुर यांच्यावर टीका केली होती. तेव्हा थरूर यांनी सध्या मला यावर बोलण्यास वेळ नाही, आल्यावर पाहू, असे म्हणत प्रत्तुत्तर दिले होते. आता थरूर आणि इतर शिष्टमंडळदेखील भारतात आली आहेत. त्यांनी पंतप्रधान मोदींची भेटही घेतली आहे. यावेळी देखील थरूर आणि मोदी यांच्यात चांगली मैत्री दिसली होती. थरुर आणि काँग्रेस हायकमांड यांच्यात २०२० पासूनच मतभेद आहेत. शशी थरूर हे जी-२३ नावाच्या नेत्यांपैकी एक होते.



### शशी थरुर घेतील निर्णय

आतापर्यंत गुलाम नबी आझाद आणि कपिल सिब्बल यांना पक्ष सोडावा लागला आहे. मनीष तिवारी आणि शशी थरूरसारख्या नेत्यांनादेखील बाजूलाच करण्यात आले आहे. पाकिस्तान विरोधात जाणाऱ्या या शिष्टमंडळात सहभागी करण्यासाठी काँग्रेसने वेगळ्याच नेत्यांची नावे दिली होती. परंतू, मोदींनी थरूर यांच्यासह चार नेते निवडले, ज्यांचे त्या यादीत नाव नव्हते. काँग्रेसला आता ही गोष्टीदेखील खटकू लागली आहे. यामुळे त्यामुळे २३ जून रोजी शशी थरूर यांच्यावर कारवाई झालीच तर त्यांना भाजपा पक्षप्रवेशाची ऑफर देण्याची शक्यता जरी असली सर्वस्वी निर्णय हा थरुर घेणार आहेत.

# मोशीतील कत्तलखाना आरक्षण अखेर रद्द - देवेंद्र फडणवीस

**पुणे ।** तीर्थक्षेत्र आळंदी लगत असणाऱ्या मोशी - डुडुळगाव परिसरात पिंपरी - चिंचवड महापालिकेने चार एकर जागेवर कत्तलखाना उभारण्यासाठी जागा आरक्षित केली आहे. या धक्कादायक निर्णयामुळे संपूर्ण हिंदू समाज, विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि लोकप्रतिनिधींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. अशा पवित्र स्थळी कत्तलखाना उभारण्याचा निर्णय म्हणजे हिंदू धर्म, अध्यात्म व परंपरेवर थेट हल्ला असल्याचा आरोप केला जात आहे. यासंदर्भात २१ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जो काही विकास आराखडा आहे. त्या विकास आराखड्यामध्ये मोशी-आळंदी येथे कत्तलखाण्याचे आरक्षण दाखवण्यात आले आहे. मात्र, कुठल्याही परिस्थितीमध्ये कत्तलखाना होऊ दिला जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारकऱ्यांना सांगितले.

